प्रबोवो सुबिआंतो इंडोनेशियाचे नवे अध्यक्ष

जकार्ता : इंडोनेशियाचे आठवे अध्यक्ष म्हणून प्रबोवो सुबिआंतो (वय ७३) यांनी रविवारी शपथ घेतली. लष्करामध्ये विशेष कमांडो म्हणून त्यांनी काम केले आहे. इंडोनेशियामध्ये लष्करी हुकुमशाही असलेल्या काळात मानवी हक्कांचा भंग केल्याचा आरोप त्यांच्यावर होता. जिब्राान राका (वय ३७) यांनी इंडोनेशियाच्या उपाध्यक्षपदाची शपथ घेतली. सुबिआंतो यांचे अभिनंदन करण्यासाठी रस्त्यावर हजारो लोकांनी गर्दी केली होती. परदेशातूनही काही विशेष पाहुणे त्यांच्या शपथविधीला उपस्थित होते. राजधानी जकार्ता बँनर आणि फलकांनी भरून गेली होती. इंडोनेशिया जगातील तिसरी सर्वांत मोठी लोकशाही असणारा देश म्हणून ओळखला जातो. या ठिकाणी मध्यमवर्ग मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. सुबिआंतो यांच्यावरील आरोपांमुळे त्यांना १९९८ मध्ये लष्करामधून काढून टाकण्यात आले. मात्र, त्यांच्यावर कुठल्याही प्रकारची सुनावणी झाली नाही.

झारखंडमध्ये 'इंडिया' आघाडीत मतभेद

राजद नाराज; काँग्रेस-झामुमोमध्येही आलबेल नाही

वृत्तसंस्था, रांची

झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी जागावाटपावरून 'इंडिया' आघाडीच्या घटक पक्षांमध्ये मतभेद असल्याचे उघड झाले आहे. आधी राष्ट्रीय जनता दलाने (राजद) कमी जागा मिळाल्याबद्दल नाराजी व्यक्त केली, त्यानंतर रविवारी झालेल्या काँग्रेस आणि झारखंड मुक्ती मोर्चाच्या (झामुमो) बैठकीनंतर सर्व काही आलबेल नसल्याचे समोर आले.

रविवारी झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन आणि काँग्रेसचे सरचिटणीस के सी वेणुगोपाल यांनी जागावाटपाची बोलणी केली. चर्चेतून आनंदाची बातमी मिळाली नाही असे झामुमोच्या सूत्रांनी सांगितले तर हरियाणा विधानसभा निवडणुकीचे निकाल विरोधात गेल्यामुळे झामुमो दबावतंत्र वापरत असल्याचा आरोप काँग्रेसच्या नेत्याने केला. झामुमोने आपल्या कोट्यातून काही जागा राजगसाठी सोडाव्यात अशी काँग्रेसची मागणी आहे, ती झामुमोने मान्य केली नाही.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही पक्षांमध्ये उरलेल्या सूत्रामध्ये झामुमो ८१पैकी ५० जागा लढवणार आहे तसेच डाव्या पक्षांना त्यांच्या कोट्यातील जागा दिल्या जाणार आहेत. काँग्रेसच्या वाट्याला ३१ जागा येणार असून त्यातूनच राजदला जागा दिले जाणे अपेक्षित आहे. यापेक्षा जास्त जागा मिळण्याची राजदची मागणी निराधार असल्याचे झामुमोचे म्हणणे आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत राजदने झामुमोची तीन जागांची मागणी मान्य केली नव्हती, त्यामुळे आम्ही आता जास्त जागा का द्याव्या असा प्रश्न झामुमोचे नेते करत आहेत.



राहुल गांधी आणि सोरेन यांच्यात शनिवारी चर्चा झाली.

राजदची १२ जागांची मागणी

हेमंत सोरेन यांनी काँग्रेस व झामुमो आघाडीपासून ८१पैकी ७० जागा लढवणार असल्याचे शनिवारी जाहीर केले. उरलेल्या ११ जागा राजद आणि डाव्या पक्षांसाठी सोडल्या जाणार आहेत. मात्र, सोरेन यांची घोषणा एकतर्फी असल्याचे सांगत राजदने रविवारी किमान १२ जागांची मागणी केली. त्याचवेळी आपल्या पक्षाने स्वबळावर निवडणूक लढवली तरी 'इंडिया' आघाडीचे नुकसान होऊ देणार नाही असा दावाही पक्षाने केला आहे.

> १२-१३ जागांपेक्षा कमी जागा आम्हाला मान्य नाही. कारण राजदची १८ ते २० जागांवर मजबूत पकड आहे. आम्हाला जर तीन-चार जागांवर निवडणूक लढविण्यास सांगण्यात आले तर आम्ही कोणताही त्याग करण्यास तयार नाही. भाजपला पराभूत करणे हाच आमचा एकमेव उद्देश आहे.
>
> -मनोजकुमार झा, खासदार व प्रवक्ते, राजद

बांगलादेशात सोळावी घटनादुरुस्ती अवैधच

न्यायालयाचा निर्णय, सर्वोच्च न्यायिक मंडळाची पुनर्स्थापना

पीटीआय, ढाका

बांगलादेशच्या सर्वोच्च न्यायालयाने रविवारी सर्वोच्च न्यायिक मंडळ पुन्हा प्रस्थापित केले. या मंडळाचे न्यायिक गैरवर्तनाची चौकशी करण्याचेही अधिकार अबाधित ठेवले. तसेच, सोळावी घटनादुरुस्ती अवैध ठरविल्याचा आदेश कायम ठेवला. या घटनादुरुस्तीने न्यायाधीशांना काढून टाकण्याचे अधिकार संसदेला देण्यात आले होते.

सर्वोच्च न्यायालयाचे वकिल रुहूल कुद्दस यांनी न्यायालयाच्या निर्णयाची माहिती पत्रकारांना दिली. ते म्हणाले, मुख्य न्यायाधीश सईद रेफात अहमद यांच्या अध्यक्षतेखाली सर्वोच्च न्यायालयाच्या अपिलीय विभागाच्या सहा सदस्यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. न्यायालयाच्या निर्णयामुळे मूळ घटनात्मक तरतुदी पुन्हा लागू झाल्या.

शेख हसीना यांच्या सरकारने सोळावी घटनादुरुस्ती करून न्यायाधीशांना हटविण्याचे अधिकार संसदेकडे घेतले होते. सर्वोच्च न्यायालयाने ही घटनादुरुस्ती अवैध ठरवली. यापूर्वी ते अधिकार सर्वोच्च न्यायालयाच्या मंडळाकडे होते. या मंडळात सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचा समावेश असायचा. जानेवारी २०१४मध्ये सोळावी घटनादुरुस्ती करण्यात आली. मात्र, मे २०१६ मध्ये उच्च न्यायालयाने ही घटनादुरुस्ती अवैध ठरवली. जानेवारी २०१७ मध्ये या निर्णयाला आव्हान देण्यात आले. जुलै २०१७ मध्ये सात जणांच्या खंडपीठाने घटनादुरुस्ती अवैध असल्याचा निकाल दिला. या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची याचिका हसीना सरकारने केली होती. या याचिकेवर विद्यमान सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांनी निकाल दिला.

बाजार आवारात 'सेस' नकोच

पुणे : कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील खरेदी-विक्रीवर आकारण्यात येणारे बाजार शुल्क (सेस) नको, अशी भूमिका राज्यभरातील व्यापाऱ्यांनी घेतली आहे. बाजार आवारात आकारण्यात येणाऱ्या सेसला व्यापाऱ्यांनी विरोध केला आहे.

शेतीमाल खरेदी-विक्री नियमन मुक्त करण्यात आला. बाजार समितीच्या आवाराबाहेर व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कोणतेही कर नाहीत. बाजार आवारातील सेस कमी अथवा रद्द करण्याची मागणी राज्यभरातील व्यापाऱ्यांकडून अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे. या परिषदेत पुण्यासह मुंबई, नवी मुंबई, नाशिक, नागपूर, बारामती, नगर, बार्शी, लातूर, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, कराड, सातारा, पंढरपूर, जळगाव, धुळे, उल्हासनगर येथील विविध व्यापारी संघटनांचे ७५ पदाधिकारी सहभागी झाले होते. ऑनलाइन पद्धतीने शंभर पदाधिकारी सहभागी झाले होते.

दिल्लीतील सीआरपीएफ शाळेजवळ स्फोट

पीटीआय, नवी दिल्ली

दिल्लीतील रोहिणी येथील प्रशांत विहार भागातील सीआरपीएफ शाळेजवळ रविवारी सकाळी मोठा स्फोट झाला. या स्फोटात कोणीही जखमी झाले नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

हा स्फोट सकाळी ७.५०च्या सुमारास झाला. स्फोटाचे कारण शोधण्यासाठी रोहिणी येथील सीआरपीएफ शाळेजवळ बॉम्बशोधक पथक आणि पोलीस फॉरेन्सिक टीम घटनास्थळी रवाना झाली. तर, राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) आणि राष्ट्रीय सुरक्षा अधिकारीही घटनास्थळी पोहोचले.

याबाबत पोलिसांनी सांगितले की, शाळेची भिंत, जवळपासची दुकाने आणि एका कारचे नुकसान झाले असून या परिसराची नाकेबंदी करण्यात आली आहे.

कोणीही जखमी नाही; स्थानिकांमध्ये घबराट



घटनास्थळावरून धुराचे लोट उठताना दिसत होते. स्फोटानंतरचा एक कथित व्हिडिओदेखील समाजमाध्यमांवर समोर आला आहे. स्फोट झाला तेव्हा जवळपास कोण उपस्थित होते हे शोधण्यासाठी मोबाईल डेटा गोळा करत असल्याचे दिल्ली पोलिसांनी सांगितले.

फॉरेन्सिक तज्ज्ञांनी सीआरपीएफ शाळेच्या बाहेरील भागाची तपासणी केली असता, घटनास्थळावरून संशयास्पद 'पांढरी पावडर' आढळून आली. ती तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवली आहे. त्याचबरोबर शाळेच्या भिंतीजवळ खड्डा खोदून मातीचे नमुनेही घेण्यात आले आहेत.

एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, 'आमची फॉरेन्सिक टीम आणि गुन्हे विभाग स्फोटाच्या ठिकाणावरून नमुने गोळा करण्यासाठी घटनास्थळी उपस्थित होते. हा फटाका असण्याची शक्यता आहे, परंतु आम्ही या संपूर्ण प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास करत आहोत,' असे अधिकारी म्हणाले. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तपासत असल्याचेही पोलिसांनी सांगितले. 'आम्ही जवळपासच्या पोलीस ठाण्यांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

पर्यटकांकडून महिलेची हत्या

(पान १वरून) राहिला व त्याला इतर गावकऱ्यांच्या मदतीने धामणस्कर यांनी पकडून ठेवले. आपल्या साथीदाराला नेण्यासाठी आरोपी पुन्हा घटनास्थळी आले. गावकरी साथीदाराला सोडत नसल्याचा रागातून त्यांनी धामणस्कर यांना गाडीखाली चिरडले व पसार झाले. जखमी झालेला धामणस्कर यांचा उपचारांदरम्यान मृत्यू झाला. पोलिसांनी इरण्या यमनप्या धोत्रे याला घटनास्थळावरून अटक केली. तर आकाश गावडे, विकी प्रेमसिंग गिल यांनाही अटक झाली असून अन्य आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

काशी आरोग्य सेवेचे केंद्र ठरणार

पंतप्रधानांद्वारे वाराणसीत नेत्र रुग्णालयाचे उद्घाटन

पीटीआय, वाराणसी

काशी हे धर्म आणि अध्यात्माचे केंद्र म्हणून ओळखले जात होते. तथापि, आता आरोग्य सेवेचे केंद्र म्हणून उदयास येणार असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. ते त्यांच्या वाराणसी लोकसभा मतदारसंघात आर जे शंकर नेत्र रुग्णालय उद्घाटन समारंभाला संबोधित करीत होते. या वेळी त्यांनी पूर्व उत्तर प्रदेशची उपेक्षा केल्यावरून पूर्वीच्या सरकारांवर टीकाही केली. 'तमसो मा ज्योतिर्गमय' (अंधःकारातून प्रकाशकडे) चा पाठही मोदींनी या वेळी केला. वाराणसीत आता अनेक उत्कृष्ट आरोग्य उपचार सुविधा उपलब्ध असल्याचेदेखील त्यांनी सांगितले.

दरम्यान, गेल्या १० वर्षांत २५ कोटी लोक गरिबीतून बाहेर आले असल्याचे सांगत जनतेच्या आरोग्यवर सरकारने लक्ष केंद्रित केल्याचे ते म्हणाले. येथील नेत्र रुग्णालय आध्यात्मिकता आणि आधुनिकतेचा संगम असल्याचे ते म्हणाले. आर जे शंकर नेत्र रुग्णालय देशात काशी मताद्वारे संचालित होणारे १४वे रुग्णालय आहे.



शंकराचार्यांशी भेट

उद्घाटनापूर्वी पंतप्रधानांनी कांचीच्या शंकराचार्यांची भेट घेतली. या नेत्र रुग्णालयाचा पूर्व उत्तर प्रदेशातील २० जिल्ह्यांतील जनतेसह बिहार, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडच्या सीमेवरील भागातील नागरिकांनाही लाभ मिळणार आहे. १८ जूननंतर पंतप्रधानांनी वाराणसीला प्रथमच भेट दिली. तत्पूर्वी लाल बहादूर शास्त्री विमानतळावर आगमन होताच राज्यपाल आनंदीबेन पटेल आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी त्यांचे स्वागत केले.

उत्तर गाझावरील हल्ल्यात ८७ ठार

इस्रायलच्या अन्य हल्ल्यांत ४० जखमी

वृत्तसंस्था, डेरल अ बलाह

इस्रायलने गाझा पट्टीच्या उत्तरेकडे शनिवारी रात्री केलेल्या हल्ल्यात किमान ८७ जणांचा मृत्यू झाला, तर काही जण बेपत्ता झाले. गाझामधील आरोग्य मंत्रालयाने ही माहिती दिली. तसेच, बीत लाहिया या शहरावरील हल्ल्यात ४० जखमी झाले.

इस्रायलचे इराणवरील हल्ल्याचे नियोजन कसे आहे, याबाबतची गोपनीय कागदपत्रे अनधिकृतपणे प्रसिद्ध केलेल्या प्रकरणाचा तपास अमेरिका करीत असतानाच इस्रायलने हा हल्ला केल्याची माहिती अमेरिकेच्या तीन अधिकाऱ्यांनी दिली. या कागदपत्रांमध्ये इस्रायल लष्करी हल्ला करण्यासाठी आपली सामग्री हलवीत आहे, असे सांगण्यात आले होते. इराणने १ ऑक्टोबर रोजी केलेल्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांच्या हल्ल्याला इस्रायल प्रत्युत्तर देणार होता. अमेरिकेची भू-अवकाश गुप्तचर संस्था आणि राष्ट्रीय सुरक्षा संस्था यांचा हवाला देऊन गोपनीय म्हणून त्याची नोंद होती. अमेरिकेच्या अधिकाऱ्यांनी नाव न सांगण्याच्या अटीवर ही माहिती दिली.

उत्तर गाझा पट्टी युद्धामुळे उद्ध्वस्त

गेल्या वर्षी हमासने इस्रायलवर केलेल्या हल्ल्यानंतर गाझा पट्टीच्या उत्तरेकडील भाग इस्रायल सातत्याने लक्ष्य करीत आहे. सातत्याने केलेल्या या हल्ल्यामुळे हा भाग उद्ध्वस्त झाला आहे. इस्रायलने या भागाला गेल्या दोन आठवड्यांपासून जवळपास पूर्ण वेढा घातला आहे. हमास संघटना या भागात पुन्हा एकदवटण्यास सुरुवात झाल्याचे इस्रायलने म्हटले आहे.

संशयित दहशतवाद्याला जर्मनीत अटक

बर्लिन : इस्लामिक स्टेट या दहशतवादी संघटनेशी संबंध असलेल्या संशयित दहशतवाद्याला जर्मनीमध्ये पकडण्यात आले. हा दहशतवादी लीबियाचा असून, इथायलच्या दूतावासावर तो हल्ला करणार होता. बर्लिनजवळ बर्नो शहरात शनिवारी दहशतवाद्याला अटक करण्यात आली. त्याच्या घराची झाडती घेण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. ओमर ए असे या दहशतवाद्याचे नाव आहे.

माहिती दिली.

हमास संघटनेचा म्होरक्या याह्या सिनवर याचा गेल्या आठवड्यात खात्मा केल्यानंतर गाझामध्ये युद्धविरामासाठी अमेरिकेचा इस्रायलकडे आग्रह आहे. पण, इस्रायलसह हमासदेखील अशा प्रकारच्या युद्धविरामास तयार नाही. इराणचा हमास आणि लेबनॉनमधील हेजबोला संघटनेला पाठिंबा आहे. या महिन्याच्या सुरुवातीला लेबनॉनमध्ये इस्रायलने जमिनीवरून सैन्य घुसवले आहे.

बंगालच्या उपसागरात चक्रीवादळाचा इशारा

पीटीआय, भुवनेश्वर

बंगालच्या खाडीवर चक्रीवादळ धडकण्याची शक्यता भारतीय हवामान खात्याने (आयएमडी) व्यक्त केली आहे. या चक्रीवादळाचा परिणाम ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या किनारपट्टीला जाणवेल असेही हवामान खात्याने म्हटले आहे. पुढील २४ तासांत अंदमान समुद्रावरील हवेच्या चक्रीवादळाचे बंगालच्या उपसागरात कमी दाबाच्या पट्ट्यात रूपांतर होण्याची शक्यता आहे.

विशेष बुलेटिनमध्ये दिलेल्या माहितीनुसार, हवामान प्रणाली पश्चिम-वायव्य दिशेने सरकण्याची तसेच २२ ऑक्टोबर सकाळपर्यंत तीव्र होण्याची, तर २३ ऑक्टोबरपर्यंत पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरावर चक्रीवादळ निर्माण होण्याची शक्यता आहे. हवामान प्रणाली पश्चिम-उत्तर-पश्चिम दिशेने सरकून २२ ऑक्टोबरच्या सकाळपर्यंत गती तीव्र होईल आणि २३ ऑक्टोबरच्या सकाळपर्यंत पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरातील चक्रीवादळ किनारपट्टीपासून वायव्य बंगालच्या उपसागरात पोहोचण्याची दाट शक्यता आहे.

मुसळधार पावसाची शक्यता

चक्रीवादळाच्या प्रभावामुळे २३ ते २५ ऑक्टोबरदरम्यान ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या किनारपट्टी परिसरात मुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच मच्छिमारांना २९ ऑक्टोबरपर्यंत किनारपट्टीवर परतण्याचा सल्ला देण्यात आला आहे. २३ ऑक्टोबरपासून ओडिशाच्या काही भागांत मुसळधार ते अतिवृष्टीची शक्यता असल्याची माहिती आयएमडीचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी दिली. किनारपट्टीवरील काही भागांत २४-२५ ऑक्टोबरला २० सें.मी. तर काही ठिकाणी ३० सें.मी. पाऊस, तर काही ठिकाणी ३० से.मी.पेक्षा जास्त पावसाची शक्यता असल्याचे ते म्हणाले. यामुळे पश्चिम बंगाल आणि आंध्र प्रदेशात हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

ताशी ६० कि.मी. वाऱ्यांचा वेग

२३ ऑक्टोबरच्या सायंकाळपासून ओडिशा-पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवर ताशी ४०-५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता असून तो ताशी ६० किमीपर्यंत पोहोचू शकतो. २४ ऑक्टोबरच्या रात्रीपासून ते २५ ऑक्टोबरच्या सकाळपर्यंत, ते हळूहळू १००-११० किमी प्रतितासपर्यंत वाढू शकते आणि १२० किमी प्रतितासपर्यंत पोहोचू शकते, असे आयएमडीने म्हटले आहे.

राजस्थानात रस्ते अपघातात १२ ठार

जयपूर : राजस्थानच्या धोलपूर जिल्ह्यात बस आणि टेम्पोची धडक होऊ एकाच कुटुंबातील १२ जण ठार झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. मृतांमध्ये आठ लहान मुलांचा समावेश आहे. बारीचे ठाणे अंमलदार शिवहरी मीणा यांनी सांगितले की शनिवारी रात्री हा अपघात झाला.

भरधाव स्लीपर कोच बस ग्वाल्हेरहून जयपूरला जात असताना तिने सुमीपूरजवळ एका टेम्पोला धडक दिली. सर्व मृत एका विवाह समारंभाला हजेरी लावून परतत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले असून मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी दोन लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान आणि जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

न्यायाधीशांच्या वर्तनाचा जनतेवर परिणाम!

न्या. गवई यांचे न्यायिक नैतिकता आणि सचोटीसाठी आग्रही प्रतिपादन

पीटीआय, अहमदाबाद

न्यायिक नैतिकता आणि सचोटी हे विधि प्रणालीची विश्वासार्हता टिकवून ठेवणारे मूलभूत स्तंभ आहेत असे मत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्या. भूषण रामकृष्ण गवई यांनी रविवारी व्यक्त केले. ते अहमदाबादमध्ये गुजरातच्या न्यायिक अधिकाऱ्यांच्या वार्षिक परिषदेत बोलत होते. न्यायाधीशांनी निवडणूक लढवण्यासाठी राजीनामा दिला तर त्यामुळे निष्पक्षतेबद्दल जनतेच्या दृष्टीकोनावर परिणाम होऊ शकतो असेही ते यावेळी म्हणाले.



न्यायाधीश म्हणून काम करत असताना आणि काम करत नसताना, न्यायाधीशाचे वर्तन हे न्यायिक नैतिकतेचा सर्वोच्च मापदंडांनुसारच असायला हवे. न्यायाधीश म्हणून कार्यरत असताना एखाद्या राजकीय नेत्याची किंवा सनदी अधिकाऱ्याची प्रशंसा केल्यास जनतेच्या संपूर्ण न्यायव्यवस्थेवरील विश्वासावर परिणाम होऊ शकतो असा इशारा न्या. गवई यांनी दिला. अमेरिकेत अध्यक्षपदाच्या उमेदवारावर टीकात्मक टिप्पणी करणाऱ्या अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाला माफी मागावी लागली होती याचे उदाहरण त्यांनी दिले. तसेच पदाचा राजीनामा देऊन तातडीने निवडणूक लढवणाऱ्या न्यायाधीशांच्या निष्पक्षतेबद्दल जनतेच्या मनात शंका उपस्थित होऊ शकतात असे न्या. गवई यांनी उपस्थितांच्या लक्षात आणून दिले.

इंदिरा श्रमिक महिला नागरी सहकारी बँक नि. सोलापूर (अवसायनात)

254, साखर पेठ, लक्ष्मी बँकेजवळ, सोलापूर 413005

संदर्भ :- ई निविदा नोटीस दि. 21.10.2024

दुसरी ई- टेंडरबाबत सूचना (मुदतवाढ)

उक्त संदर्भीय नोटीसाद्वारे, इंदिरा श्रमिक महिला ना. सह. बँक नि. सोलापूर (अवसायनात) या बँकेची मालमत्ता विक्री करणेसाठी ई-निविदा मागविण्यात आली असून ई-निविदा दाखल करण्यासाठी दि. 05.11.2024 सकाळी 11.30 वा. वाजेपर्यन्त मुदतवाढ देण्यात येत आहे.

अटी व शर्तीमध्ये कोणतेही बदल करण्यात आलेला नाही. अधिक माहितीकरिता www.mahaetenders.gov.in या संकेत स्थळावर भेट द्यावी.

स्वाक्षरीत /-

डॉ. सौ. वैशाली साळवे,

अवसायक इंदिरा श्रमिक महिला ना. सह. बँक नि. सोलापूर (अवसायनात) तथा सहाय्यक निबंधक, सह. संस्था, सोलापूर.

जाहीर सूचना

याद्वारा आम जनतेस आणि भारतीय/ मराठी फिल्म इंडस्ट्रिच्या सदस्यांना सूचना देण्यात येते की, मुंबईच्या उच्च न्यायालयाचे माननीय न्यायधीश अरिफ डॉक्टर यांच्याद्वारा प्रत्येकी मंजूर झालेल्या दिनांकित २४ व ३० सप्टेंबर, २०२४ आदेशांद्वारे (**"उच्च न्यायालय आदेश"**), प्लॅनेट मराठी जी मुलुंड, मुंबईमध्ये स्थित असलेली एक भागीदारी फर्म, आणि तिचे भागीदार, अक्षय विलास बर्दापुरकर व सौम्या विलेकर, प्रत्येकाने भागीदार फर्मच्या कोणत्याही संबंधित मालमत्तेची, संपूर्ण किंवा भागशः, विक्री, अभिहस्तांकन, परवाना, किंवा कोणत्याही प्रयत्स्थ पक्षकाराची निर्मिती किंवा हस्तांतरण करणार नाहीत आणि प्रत्येक भागीदार त्यांच्या वैयक्तिक क्षमतेत, त्यामध्ये सिनेमाटोग्राफ फिल्म्स किंवा अन्य ऑडिओ-चिल्प्युअल सामग्री, अंतर्भूत अंतर्निहित बौद्धिक मालमत्ता किंवा सदर मतेवरील अन्य हक्क, इ. चा समावेश आहे. सदर कोणत्याही प्रकारचे आचरण उच्च न्यायालयाच्या आदेशांचा अवमान ठरेल.

निम्नस्वाक्षरीकार आणि वरील पक्षकारांनी सदर मतेसंबंधित त्यांच्या वादांच्या निवारणाकरिता लवाद सादर केलेले आहेत.

ही सूचना जनहितार्थ निर्गमित करण्यात येत आहे.

स्थळ : मुंबई — दिपा ट्रेसी

दिनांक : १९ ऑक्टोबर, २०२४ — अंधेरी (पश्चिम), मुंबई

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३, भारत

सीआयएन: U74999MH2008PLC185349 | ई-मेल: ig-mcxccl@mcxccl.com | संकेतस्थळ: www.mcxccl.com

३० सप्टेंबर २०२४ रोजी संपलेल्या तिमाही व सहामाहीच्या अलेखापरीक्षित आर्थिक परिणामांचे सार (₹ लाखांमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही ३० सप्टेंबर २०२४ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३० जून २०२४ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३० सप्टेंबर २०२३ अलेखापरीक्षित	संपलेली सहामाही ३० सप्टेंबर २०२४ अलेखापरीक्षित	संपलेली सहामाही ३० सप्टेंबर २०२३ अलेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च २०२४ लेखापरीक्षित
१. प्रचालनातून एकूण उत्पन्न	६,३५९	५,४३४	४,२९५	११,७९३	७,५८७	१६,७३६
२. कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबीपूर्वी)	४,२७२	३,०२४	(१,१३७)	७,२९६	(१,४४०)	३,२८२
३. कालावधीकरिता करपूर्वीचा निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	४,२७२	३,०२४	(१,१३७)	७,२९६	(१,४४०)	३,२८२
४. कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	४,२७२	३,०२४	(१,१३७)	७,२९६	(१,४४०)	३,२५९
५. कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न/(तोटा) [(कालावधीकरिता सर्वसमावेशकनफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	४,२८५	३,०१३	(१,१५५)	७,२९८	(१,४५९)	३,२४२
६. समभाग भांडवल (₹१०/- प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०
७. राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	-	-	-	-	-	(१६,८६८)
८. प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/- प्रत्येकी)* मूलभूत आणि सौमिकृत (₹)	१.७८	१.२६	(०.४७)	३.०४	(०.६०)	१.३६

** अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.*

नोंद:

१. वरील तक्ता त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ www.mcxccl.com वर उपलब्ध आहे.

२. वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन लेखापरीक्षा समितीकडून दिनांक १९ ऑक्टोबर २०२४ रोजी केले गेले आहे आणि दिनांक १९ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत त्यांना मान्यता मिळाली आहे.

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता

स्वाक्षरी/-

नरेंद्र कुमार अहलावत

व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ: मुंबई | दिनांक: १९ ऑक्टोबर २०२४